**महाराष्ट्र शासन**
**आयुक्त मत्स्यव्यवसाय**
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मित्तल टॉवर, २४, सी विंग, २रा मजला, विधान भवनासमोर, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१
**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**COMMISSIONER OF FISHERIES,**
Mittal Tower, 24, 'C' Wing, 2nd Floor, In front of Vidhan Bhavan, Nariman Point Mumbai-400021

जा.क्र.मत्स्य/PMMSY/SPU/LuckyDraw/०३१७०१/१८५/२०२४-२५ (भाग-२) दि. /०२/२०२६

प्रति,

१. प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय,
मुंबई विभाग/पुणे विभाग /नाशिक विभाग / छ. संभाजीनगर विभाग/
अमरावती विभाग /लातूर विभाग /नागपूर विभाग.

२. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,
मुंबई शहर/मुंबई उपनगर/ठाणे/पालघर/रायगड/ रत्नागिरी/सिंधुदुर्ग/पुणे/सातारा/ सांगली/सोलापूर/
कोल्हापूर/नाशिक/नंदूरबार/धुळे/जळगाव/अहिल्यानगर/नागपूर/भंडारा/गोंदिया/वर्धा/गडचिरोली/
चंद्रपूर/अमरावती/बुलढाणा/वाशीम/अकोला/यवतमाळ/जालना/छ.संभाजीनगर/बीड/परभणी/
लातूर/हिंगोली/नांदेड/धाराशिव

**विषय : प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ अंतर्गत नव्याने रद्द झालेल्या प्रकल्पासाठी शिल्लक अर्जकर्त्यांतुन समान घटक व समान प्रवर्ग या निकषानुसार लॉटरी/सोडत पध्दतीने लाभार्थी निवड करण्याबाबत...**

**संदर्भ :** शासन पत्र क्र.मत्स्यवि ११२४/प्र.क्र.१८०/पदुम-१४, दि.१७.०२.२०२६.

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या कालावधीत मंजुर कृती आराखडयानुसार रद्द प्रकल्पासाठी दि.१३.१०.२०२३ रोजीच्या जाहीरातीच्या अनुषंगाने प्राप्त व पात्र ठरलेल्या अर्जकर्त्यांपैकी सदयस्थितीत २० घटकाखाली २९०६ अर्जकर्ते शिल्लक आहेत. त्यापैकी खालील नमुद १५ घटकाखाली २७५२ शिल्लक अर्जकर्त्यांमधुन नव्याने रद्द झालेल्या प्रकल्पांकरीता समान घटक व समान प्रवर्ग या निकषानुसार लॉटरी/सोडत पध्दतीने लाभार्थी निवड करण्यात येणार आहे.

**तथापि ज्या घटक व प्रवर्गासाठी रद्द प्रकल्प उपलब्ध नाहीत, अशा १५३ अर्जकर्त्यांचा लॉटरी/सोडत प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला नाही. त्याची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे. तसेच पर्यटनात्मक मत्स्यव्यवसाय या घटकाखाली अनु.जमाती प्रवर्गामध्ये उपलब्ध १ प्रकल्पाकरीता १ अर्जकर्ता शिल्लक शिल्लक असल्याने लॉटरी/सोडत प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला नाही.**

त्यानुसार **रु.३९.९६७५ कोटी** प्रकल्प किंमतीच्या ९९ प्रकल्प व बायोफ्लॉक पॉन्ड घटकासाठी २.५२५ हे. क्षेत्राकरीता समान घटक व समान प्रवर्गातुन लाभार्थी निवडीसाठी रु.१०७४.१०२५ कोटी प्रकल्प किंमतीचे **२७५२ अर्जकर्ते शिल्लक** आहेत. या ९९ प्रकल्प व बायोफ्लॉक पॉन्ड घटकासाठी २.५२५ हे. क्षेत्राकरीता लाभार्थी निवडीसाठी **लकी ड्रॉ पध्दत दि.२३.०२.२०२६ रोजी दु.०३.०० वा. मा. सचिव, (पदुम) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.**

लॉटरी/सोडत पध्दतीने लाभार्थी निवड करण्यासाठी घटक व प्रवर्ग निहाय उपलब्ध प्रकल्प व शिल्लक अर्जकर्त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | सर्वसाधारण | | अ.जा. | | अ.जमाती | | महिला | | एकुण प्रकल्प किंमत (रु.कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उपलब्ध प्रकल्प | शिल्लक अर्जकर्ते | उपलब्ध प्रकल्प | शिल्लक अर्जकर्ते | उपलब्ध प्रकल्प | शिल्लक अर्जकर्ते | उपलब्ध प्रकल्प | शिल्लक अर्जकर्ते | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | Construction of Biofloc ponds for Freshwater areas including inputs of Rs 4 lakhs/Ha | - | - | - | - | - | - | 2.525 Ha | 104 | 3.535 |
| 2 | Establishment of large Biofloc (50 tanks of 4m dia and 1.5 high) culture system. | - | - | - | - | 5 | 9 | 10 | 219 | 7.50 |
| 3 | Establishment of Medium RAS | - | - | - | - | - | - | 3 | 40 | 0.75 |
| 4 | Establishment of Medium Biofloc culture system(25 tanks of 4m dia and 1.m | - | - | - | - | 3 | 5 | 6 | 81 | 2.25 |
| 5 | Installation of Cages in Reservoirs | 6 | 44 | - | - | - | - | 5 | 1118 | 5.94 |
| 6 | Ice Plant/Cold storage of minimum 10-ton | - | - | - | - | - | - | 3 | 10 | 1.20 |
| 7 | Ice Plant/Cold storage of minimum 20-ton | - | - | - | - | - | - | 1 | 8 | 0.80 |
| 8 | Insulated Vehicles | 1 | 29 | 3 | 14 | - | - | 1 | 305 | 1.00 |
| 9 | Refrigerated vehicles | - | - | - | - | - | - | 2 | 109 | 0.50 |
| 10 | Motor cycle with Ice Box | 5 | 69 | 3 | 7 | 1 | 4 | 2 | 47 | 0.0825 |
| 11 | Three wheeler with Ice Box including e- rickshaws for fish vending | - | - | 4 | 6 | - | - | 3 | 12 | 0.21 |
| 12 | Live fish vending Centres | 3 | 20 | 1 | 9 | 2 | 10 | 7 | 381 | 2.60 |
| 13 | Mini Mills of production Capacity of 2 ton /Day | - | - | - | - | - | - | 10 | 17 | 3.00 |
| 14 | Medium Mills of production Capacity of 8 ton /Day | - | - | - | - | - | - | 1 | 37 | 1.00 |
| 15 | Support for acquisition of Deep-sea fishing vessels for traditional fishermen | - | - | - | - | - | - | 8 | 38 | 9.60 |
| | **एकूण** | **15** | **162** | **11** | **36** | **11** | **28** | **62 व 2.525 Ha** | **2526** | **39.9675** |

*(टिप : रकाना क्र. ३,५,७ व ९ मध्ये उपलब्ध प्रकल्पांची संख्या नमुद असुन, त्यांची एकुण संख्या ९९ + बायोफ्लॉक पॉन्ड घटकासाठी २.५२५ हे. क्षेत्र अशी आहे. तसेच सदर प्रकल्पाकरीता शिल्लक अर्जकर्त्यांची संख्या रकाना क्र.४,६,८ व १० नुसार एकुण २७५२ इतकी आहेत.)*

घटक व प्रवर्गनिहाय लॉटरी/सोडत साठी पात्र लाभार्थ्यांची संपुर्ण यादी सर्व प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय व सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या फलकावर **दि.१९.०२.२०२६** रोजी **सकाळी ११:०० वाजेपर्यंत** प्रसिध्द करण्यात यावी. सदरहु ९९ प्रकल्प व बायोफ्लॉक पॉन्ड

घटकासाठी २.५२५ हे. क्षेत्राकरीता अशा एकुण २७५२ शिल्लक अर्जकर्त्यांची घटक व प्रवर्ग निहाय यादी विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे (https://fisheries.maharashtra.gov.in). या लॉटरी/सोडतीचे **थेट प्रक्षेपण विभागाच्या यु-टयुब चॅनेलव्दारे दि.२३.०२.२०२६** रोजी **दुपारी ०२:०० वाजल्यापासुन** करण्यात येणार आहे.

| | |
|---|---|
| **ऑनलाईन यु-टयुब थेट प्रक्षेपण लिंक** | यु-टयुब लाईवची लिंक २४ तास आधी प्रसारित करण्यात येईल. |

Digitally signed by
Vijay Namdeo Suryawanshi
Date: 18-02-2026 16:39:22

(डॉ. विजय सूर्यवंशी भा.प्र.से.)
आयुक्त मत्स्यव्यवसाय
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीस्तव-

१. मा. सचिव, मत्स्यव्यवसाय तथा अध्यक्ष SLAMC, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मंत्री मत्स्यव्यवसाय, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. उपसचिव (मत्स्य), कृषी व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.